महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईतील करोनाने झालेल्या मृत्यूचा आकडा लपविण्यात येत असल्याबाबत

(१) ११४२१ (०६-०८-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोविड मृतांचा आकडा लपविण्यात येत असल्याबाबत विधानसभा विरोधी पक्षनेता यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना बळींची फेरपडताळणी केल्याचे दाखवून राज्यातील आरोग्य यंत्रणेकडून मुंबईतील ८६२ व मुंबईबाहेरील ४६६ असे एकुण १३२८ कोरोना मृतांचे आकडे नव्याने जाहीर करण्यात आल्याची बाब दिनांक १६ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "डेथ ऑडिट कमिटी" ने आयसीएमआरचे निकष डावलून काही कोरोना मृतांचे आकडे दडविल्यामुळे तसेच काही अधिकाऱ्यांकडून मृतांचे आकडे लपविण्यात आल्यामुळे फेरपडताळणीत हे आकडे जाहीर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कोविड मृतांचे सुमारे १००० च्या आसपास आकडे पत्र दिल्याच्या दिनांकास उघड करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदर प्रकरणातील दोषींवर शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

राज्यातील कोरोना मृत्यू लपविण्यात येत आहेत अशा आशयाचे पत्र मा. विरोधी पक्ष नेते यांचेकडून मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालयास दिनांक २० जून २०२० रोजी प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यातील कोवीड-१९ पॉझिटिव्ह व्यक्ती आणि कोवीड-१९ मध्ये होणारे मृत्यु यांचे नियमित रिकन्सिलेशन करण्यात येते व त्यामध्ये केसेस व मृत्युच्या आकडयांमध्ये फरक आढळल्यास तो दुरूस्त करण्यात येतो. यासाठी सर्व जिल्हयांना कळविण्यात येते. त्यानूसार दिनांक १६.०६.२०२० च्या दैनंदिन अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ८६२ व उर्वरित राज्यातील ४६६ असे एकूण १३२८ मृत्युची नोंद घेण्यात आली. मुंबईसह राज्यातील सर्व रुग्णालयांकडून अहवाल संकलित करणे, प्रलंबित अहवालांचा पाठपुरावा करणे ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून माहिती मिळण्यास काही वेळा विलंब झाला तरी त्यामध्ये कोणतीही माहिती लपविण्याचा उद्देश नाही.

(३) हे खरे नाही.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार कोवीड-१९ आजार येण्यापूर्वीपासून सांसर्गिक आजारामुळे होणाऱ्या मृत्युचे विश्लेषण मृत्यू अन्वेषण समिती मार्फत करण्यात येते. डेथ ऑडीट कमिटीने जागतिक आरोग्य संघटना आणि आयसीएमआर यांनी दिलेले निकष विचारात घेवून मृत्यूची कारणनिश्चिती व विश्लेषण केलेले आहे.

(४) हे खरे नाही.

मुंबईसह राज्यातील सर्व रुग्णालयांकडून अहवाल संकलित करणे ही सतत चालणारी प्रक्रिया असून माहिती संकलित झाल्यावर व प्रयोगशाळेतील अहवाल मिळाल्यावर मृत्यूचे आकडे वेळोवेळी जाहीर केले जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कोरोना लसीकरण प्रक्रियेमध्ये उद्भवणा-या समस्यांचे निराकरण करण्याबाबत

(२) २७२१५ (१६-०६-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संक्रमण रोखण्यासाठी तसेच तिस-या लाटेची गती कमी करण्यासाठी प्रत्येक नागरीकांचे मोफत लसीकरण करण्याचे शासनाने निश्चित केले असून त्याअनुषंगाने मुंबईसह राज्यात आतापर्यत किती नागरीकांचे लसीकरण करण्यात आले आहे,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील अनेक गावे, वाडया व दुर्गम भागातील नागरीकांचे कोरोना प्रतिबंधक लसीकरण करण्यासाठी जिल्हयातील एकूण १८५ उपकेंद्रात डॉक्टरांची नियुक्ती न केल्यामुळे नागरीकांचे १०० टक्के लसीकरण मोहिम राबविण्यास अडचणी उदभवतात तसेच लसीकरणासाठी ओळखपत्र असणे गरजेचे आहे तथापि गोदिंया शहरात भटकंती करुन उदरनिर्वाह करणा-या १८०० भिका-यांची नोंद असून त्यातील १२०० लोकांकडे ओळखपत्रे असल्याचे निदर्शनास आले उर्वरित बिना ओळखपत्र धारक लोकांचे लसीकरण करण्याबाबत उपाययोजना करणे आवश्यक असून आदिवासी समाजात लसीकरणाबाबत जनजागृती मोहिम राबविणे सुध्दा आवश्यक असुन राज्यात सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच ग्रामीण पातळीवर लसीकरण केंद्रे उभारून संयुक्त डॅशबोर्ड ही तयार करावा, अशा मागणीचे एक निवेदन लोकप्रतिनीधी,कल्याण ग्रामीण यांनी मा.मुख्यमंत्री व मा. आरोग्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० एप्रिल,२०२१ रोजी वा त्यासुमारास सादर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील प्रसिध्दी आणि दृकश्राव माध्यमातील पत्रकार व कॅमेरामन कोराना साथीच्या काळात रुग्णालयात, रस्त्यावर, स्मशानभूमीत अशा विविध ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन जनसामान्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या व्यथा मांडण्यासाठी अविरत कार्यरत असतात तसेच कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जनजागरण करण्यामध्ये सुद्धा त्यांचा मोलाचा वाटा असल्याने त्यांना फ्रन्टलाइन वर्कर्स किंवा कोरोना योद्धे म्हणून घोषित करुन त्यांना लसीकरणात प्राधान्य देण्याची मागणी पत्रकारांच्या विविध संघटनांनी तसेच विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,लसीकरणासाठी विशेष (गतीमंद/मतीमंद) युवक, अंथरुणाला खिळून असणारे व्याधीग्रस्त, वयोवृद्ध, विकलांग,निराधार व दिव्याग व्यक्तींकरिता वेगळी तरतूद नसल्यामुळे हा मोठ्या संख्येतील वर्ग लसीकरणापासून उपेक्षित असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्याने अश्या व्यक्तींना घरपोच लसीकरण किंवा इतर व्यवस्था करण्यासंदर्भा नियोजन करण्याबाबतची मागणी पालक आणि विविध स्वयंसेवी संस्थांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात १८ ते ४४ वयोगटातील सहा कोटी नागरिकांना १२ कोटी डोस उपलब्ध करण्याकरीता सहा हजार कोटी रुपये खर्च करुन थेट लस उत्पादक कंपन्याकडून खरेदी करण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक ८ मे २०२१ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले असून केंद्र सरकारने देखील आयातीसाठी राज्य सरकारला परवानगी दिली असून याकरीता कस्टम ड्युटी, वाहतूक खर्च करावा लागणार असल्याने लसीच्या किमतीचा अतिरीक्त भार वाढणार आहे तसेच केद्र शासनाने दिनांक ८ जून,२०२१ रोजी नविन लसीकरण धोरण जाहिर केल्यानुसार राज्याना लसीकरण नियोजन आराखडातयार करण्याचे निदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात अनेक भागात काही नागरिकांनी लस घेतल्यावर पुन्हा त्यांना कोरोना संक्रमण झाले असून काही नागरिकांचे मृत्यू देखील झाले आहेत तसेच मुंबईतील काही नागरिकांनी पहिल्या डोस करीता नोंदणी केली होती परंतु त्यांना डोस न घेता प्रमाणपत्र दिले गेले व दुसरा डोस घेतल्यानंतर ही पहिल्या डोस चे प्रमाणपत्र मिळाले नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, लसीकरणाच्या अंमलबजावणी बाबत उदभवणा-या समस्याचे निराकरण करण्यासह लासीकरण नियोजन आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) दि.३० जून, २०२२ अखेरपर्यंत राज्यामध्ये खालीलप्रमाणे कोविड लसीचे डोस देण्यात आले आहेत-

पहिला डोस घेतलेले लाभार्थी	९,०८,५४,२८९
दुसरा डोस घेतलेले लाभार्थी	७,४७,७६,४६६
खबरदारी डोस	३७,५६,३८७

(२) होय, दि.२०.४.२०२१ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) विविध लोकप्रतिनिधींचे निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(५) राज्यातील १८ ते ४४ वयोगटातील नागरीकांसाठी माहे मे,२०२१ मध्ये २०,३१,५८० डोसेस चे कोविशिल्ड लसीं व ४,७९,१५० डोसेस कोव्हॅक्सीन लसींची खरेदी राज्य शासनाने केलेली आहे. (एकूण २५,१०,७३०)

केंद्र शासनाने दिनांक ८ जून २०२१ रोजी नविन लसीकरण धोरण जाहिर केले आहे. परंतु नविन लसीकरण धोरणाची अंमलबजावणी दिनांक २१ जून २०२१ रोजी पासुन करण्यात येत आहे. सदर धोरणानुसार ७५% लसींचा पुरवठा केंद्रशासनामार्फत करण्यात येणार असून उर्वरीत २५% लसी या खाजगी आरोग्य संस्थानी खरेदी करण्यास परवानगी दिलेली आहे.

(६) व (७) कोरोना प्रतिबंधक लसींचे दोन्ही डोस घेतल्यानंतर साधरणपणे दोन ते चार आठवडयानंतर कोविड-१९ या आजारांशी लढण्यासाठी प्रतिपिंड (Antibodies) तयार होतात. तसेच कोविड- १९ लसीकरण झाल्यानंतर कोविड आजार होऊ शकतो, परंतु या कोविड आजाराची तीव्रता कमी असते व रुग्णालयात दाखल होण्याची गरज कमी भासते.

कोविड-१९ लसीकरणाच्या सर्व नोंदी कोविन पोर्टल वर केल्या जातात. कोविन पोर्टलवर आढळून आलेल्या तांत्रिक अडचणीची पुर्तता करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येतो.

पुणे जिल्हा परिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून होत असलेला गैरव्यवहार

(३) ३२३७८ (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम)तसेच सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत कर्मचारी मोठ्या प्रमाणात अनेक वर्षापासून कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आले आहेत , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेतील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत एनआरएचएम मधील कंत्राटी कर्मचारी असलेल्या लिपिकाला माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आर्थिक गैरव्यवहार करताना पकडण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेत आरोग्य विभागात कंत्राटी पद्धतीने काम करीत असलेल्या सदर लिपिक याची मुदत वाढ फेटाळण्यात आली असतानाही सदर कंत्राटी कामगार कंत्राटी कर्मचारी विभागात कार्यरत होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पूणे जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कंत्राटी कर्मचारी हे मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात अडकले असुन त्यांच्यावर कुठलीही शासकीय सेवा नियम बंधनकारक नसल्याने ते आर्थिक गैरवव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने चोकशी केली आहे काय, तद्नुसार पुणे जिल्हा परिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे टेंडर रद्द करून सरळ सेवाने पद भरती करण्यासह राज्यातील कंत्राटी कर्मचारी भरती प्रक्रियेची पुर्नवलोकन करून सरळ सेवेने आकृतिबंधातील पदे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (२२-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सदर लिपिकाची सेवा दिनांक १९.०६.२०२१ रोजी समाप्त करण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदभरती केंद्र शासनाच्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार करण्यात येत असते. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच सरळसेवेची पदे ही शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयाप्रमाणे भरण्यात येत असतात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

भूसावळ (जिल्हा जळगांव) येथील संत गाडगेबाबा दवाखान्यास पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी मिळणे बाबत.

(४) ३३२९८ (१०-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ नगरपरिषदेच्या संत गाडगेबाबा दवाखान्याला पुर्ण वेळे वैद्यकिय अधिकारी मिळणेबाबतचे निवेदन वैद्यकिय अधिक्षक, वर्ग-१,ग्रमिण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर, भूसावळ, जिल्हा जळगांव यांना मुख्याधिकारी, नगर परिषद, भूसावळ यांनी दिनांक २ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) ग्रामीण रूग्णालय व ट्रॅामा केअर सेंटर भुसावळ येथील एका वैद्यकीय अधिकारी यांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आरोग्य सेवेत काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना ५० लाखाचे आरोग्य विमा देण्याबाबत

(५) ३३८०० (१०-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य सेवेत काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना ५० लाखाचे आरोग्य विमा देण्याबाबत शासनाने अद्यापही आवश्यक कार्यवाही केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना कालावधीत आरोग्य सेवा प्रदान करणा-या वैद्यकीय कर्मचारी, कंत्राटी सफाई कामगार यांचा सेवा देत असतांना कोरोना विषाणूने मृत्यू झाल्यास त्यांना शासनातर्फे ५० लाखाचे आरोग्य विमा कवच देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (२४-११-२०२२) : (१) हे खरे नाही .

राज्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रत्यक्ष कोविड रुग्णालयीन सेवेशी निगडीत असल्यास अथवा कोविड सर्वेक्षणासाठी अधिग्रहीत केले असल्यास, या सेवा पुरविणाऱ्या सर्व संवर्गाना प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत विमा संरक्षण लागू आहे. तसेच दिनांक २९.०५.२०२० रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार इतर विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा कोविड साथ प्रतिबंधक व नियंत्रणाकरीता अधिग्रहीत केले असल्यास व प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत संबंधितांच्या सेवा समाविष्ट करता येणे शक्य नसल्यास मृत्यूपश्चात त्यांच्या कुटुंबियास रु.५०.०० लक्ष विमा संरक्षण राज्य शासनाकडून देय केले आहे. या योजनेंतर्गत इतर विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव संबंधित विभागामार्फत वित्त विभागास सादर करुन मान्यता घेतल्यानंतर सानुग्रह अनुदान वर्ग करण्याची कार्यवाही संबंधित विभागाकडून करण्यात येते.

(२) वैद्यकीय अधिकारी, कार्यक्रम सहाय्यक, अधिपरिचारिका, ए.एन.एम., आशा वर्कर, वाहनचालक या संवर्गातील एकूण ३४ कंत्राटी आरोग्य कर्मचारी यांचे विमा प्रस्ताव केंद्र शासनाकडून मंजूर झाले असून, त्यांचे वारसास प्रत्येकी रु.५०.०० लक्ष सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिका क्षेत्रात झालेले बालमृत्यू

(६) ३४७४३ (१०-०१-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रात विविध कारणांमुळे एका वर्षामध्ये १६ बालमृत्यू झाल्याची माहिती अधिकाऱ्यांच्या बैठकीत माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बालमृत्यूची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) श्वसावरोध, जंतुसंसर्ग, न्युमोनिया, अपुऱ्या दिवसाची प्रसुती, जन्मत: कमी वजन, जन्मजात व्यंग, इ. कारणामुळे बालकांचा मृत्यु झालेला आहे.

(३) बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाय योजना राबविण्यात येतात.

आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (Special New Born Care Unit -SNCU) नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (New Born Stabilization Unit-NBSU), नवजात शिशु कोपरा (New Born Care Corners-

NBCC), पोषण पुनर्वसन केंद्र (Nutrition Rehabilitation Centre-NRC), बालमृत्यु अन्वेषण, जंतनाशक (De-worming Drive) व जीवनसत्व “अ” मोहिम, Mother Absolute Affection (MAA), राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, अतिसार नियंत्रण पंधरवडा (IDCF), ॲनिमिया मुक्त भारत, नियमित लसीकरण
(४) प्रश्न उदभवत नाही.

लोहारा (जि.भंडारा) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील
रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

(७) ३५२७७ (१०-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा (जि.भंडारा) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टरांसह इतर कर्मचा-यांची रिक्त पदे व अपुरा औषध साठ्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑगस्ट-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा देण्याबाबत सदरील आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरुन रुग्णांची गैरसोय टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
आकृतीबंधनूसार उपकेंद्रासाठी आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व अंशकालीन स्त्री परिचर ही तीन पदे मंजूर असतात. त्यापैकी लोहारा उपकेंद्रात आरोग्य सेवक व आरोगय सेविका ही दोन पदे भरलेली आहेत. या शिवाय आरोग्यवर्धिनी कार्यक्रमाअंतर्गत समुदास आरोगय अधिकारीही नियुक्त करण्यात आला आहे. अशंकालीन स्त्री परिचर हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. यास्तव सदर पद रिक्त आहे.
लोहारा उपकेंद्रामध्ये आवश्यक औषधी साठा नियमितपणे पुरवठा करण्यात येत असून रुग्णसेवा सुरळीत देण्यात येत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) लोहारा उपकेंद्रात उपलब्ध आरोग्य कर्मचारी व पुरेसा औषध साठा असल्याने सुरळीतपणे रुग्णसेवा देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नायगाव, उमरी व धर्माबाद (जि.नांदेड) येथील रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याबाबत

(८) ३५४०४ (१०-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव, उमरी व धर्माबाद (जि.नांदेड) या नायगाव मतदार संघातील रुग्णांना रुग्णवाहिकेसाठी स्वखर्चाने मुंबईला घेऊन जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयातून रुग्णांना रुग्णवाहिका सेवा देण्यात येत नाही. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांना रुग्णवाहिका मिळत नसल्यामुळे रुग्ण उपचारापासूम वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा अंतर्गत १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहीकेद्वारे रुग्णांना मोफत सेवा उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच आयुक्तालयाच्या दि.२३.०९.२०१६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उपसंचालक आरोग्य सेवा किंवा जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार जिल्ह्याबाहेर रुग्ण संदर्भीत करण्याकरीता मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येते.

तसेच जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाच्या रेफरल ट्रान्सपोर्ट कार्यक्रमांतर्गत टोल फ्री क्रमांक १०२ वर संपर्क केला असता गरोदर माता, प्रसूती पश्चात ४५ दिवसातील माता व १ वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत संदर्भ वाहन सेचा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आरोग्य सेवांचे मुल्यांकन (IMPACT ASESSMENT) करणे बाबत

(९) ३६१२९ (१०-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनामुळे इतर आरोग्य सेवांमध्ये मोठा खंड पडला असल्याचे अनेक अभ्यासातून निदर्शनास आले असून आरोग्य सेवांचे मुल्यांकन (IMPACT ASESSMENT) करणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत कुपोषणात वाढ होण्याचे संकेत युनिसेफ कडून मिळाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास आरोग्य सेवांमध्ये खंड पडल्याने झालेल्या परिणामांचे शासनाने मुल्यांकन केले आहे काय,

(४) असल्यास ,याबाबत तात्काळ लक्ष देण्याची गरज असलेले कोणते जिल्हे शासनाने निवडले आहेत काय?

डॉ. तानाजी सावंत (२३-११-२०२२) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

लॅनसेट या आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय नियतकालिकामधील ऑगस्ट, २०२० मधील लेखानुसार तसेच प्रतिनिधी-युनिसेफ यांच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या पत्रकार परिषदेमध्ये कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेचे भारतातील लहान मुलांवर होणाऱ्या परिणामाबाबत मत व्यक्त करण्यात आले आहे. तसेच कोविड-१९ च्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये भारतातील ५ वर्षाच्या आतील वयोगटातील बालकांच्या पोषणावर त्याचा परिणाम होऊ शकतो असेही म्हटले होते.

(३) स्वतंत्र मुल्यांकन करण्यात आलेले नाही. तथापि, आरोग्य व्यवस्थापन माहिती अंतर्गत आरोग्याच्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यात येतो. दरमहा जिल्हानिहाय विविध आरोग्य निर्देशकांचे मुल्यांकन करण्यात येते.

(४) राज्य शासनाने कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या काळात आरोग्य सेवांचे बळकटीकरणासाठी तज्ञांची समिती गठीत केली होती. या समितीने कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या काळात माता व बाल आरोग्य संबंधीत सेवांचे बळकटीकरणासाठी शिफारशी केल्या व यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच याबाबत राज्य स्तरावरुन विविध कार्यक्रमाचा आढावा घेण्यात येत असून ज्या तालुक्याचे काम कमी आहे अशा तालुक्यात स्वतंत्र आढावा घेण्यात येत आहे. याबरोबरच प्रत्येक जिल्हा व मनपा साठी राज्य स्तरावरुन अधिकारी नेमण्यात आले असून ते जिल्हा / मनपा स्तरावर भेट देवून बैठक आयोजित करतात.

वैद्यकीय अधिकारी गट ब यांची सेवा जेष्ठता व बिंदुनामावली अनेक वर्ष प्रलंबित असल्याबाबत

(१०) ३७५०१ (१०-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट अ व वैद्यकीय गट ब असे दोन संवर्ग आहेत काय,
(२) असल्यास, वैद्यकीय अधिकारी गट अ व गट ब सेवा प्रवेश नियम नुसार यांचे पद नाम, शैक्षणिक पात्रता MBBS व BAMS, नियुक्ती ठिकाण, कामकाज स्वरूप व वैद्यकीय सेवा समान असून देखील वेतनश्रेणी, सेवा निवृतीचे वय गट अ वर्गासाठी ६४ व गट ब वर्गासाठी ५८ तसेच सेवा विषयक लाभ मध्ये असमानता असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट अ सेवा प्रवेश नियम दिनांक ३० ऑक्टोंबर २००० रोजीच्या शासन अधिसुचना नुसार गट ब (BAMS) यांना निवड व पदोन्नतीद्वारे गट अ संवर्गात पदोन्नती करीता पदे आरक्षित आहेत व गट ब यांची सेवा जेष्ठता व बिंदुनामावली अनेक वर्ष प्रलंबित असून व मागील २३ वर्ष पासून दिनांक ३० ऑक्टोंबर २००० रोजीच्या शासन अधिसुचनेतील तरतुदीनुसार आरक्षित पदां नुसार पदोन्नती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) १. मवैआसे वैद्यकीय अधिकारी गट-अ (एमबीबीएस) यांचे पदांची वेतनश्रेणी सुधारीत वेतनमॅट्रीक्स नुसार वेतन (एस-२०) ५६१००-१७७५०० अशी आहे तर
२. वैद्यकीय अधिकारी गट ब या पदाची वेतनश्रेणी सुधारीत वेतनमॅट्रीक्स नुसार (एस-१६) ४४९००-१४२४०० अशी आहे.
३. वैद्यकीय अधिकारी गट अ(एमबीबीएस) यांची पदे जिल्हा रुग्णालय/ उपजिरु/स्त्री रुग्णालये/संदर्भ सेवा रुग्णालये/ ग्रारु/ बिगर आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी मंजूर आहेत.
४. वैद्यकीय अधिकारी गट ब यांची पदे जि रु/ उपजिरु/ आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी / आयुर्वेदीक दवाखाने व युनानी दवाखाने या ठिकाणी मंजूर आहेत.
५. शासन अधिसूचना (वि.वि.) दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ नुसार वैद्यकीय अधिकारी (एस-२०) यांचे सेवानिवृत्तीचे वय दिनांक ३१ मे, २०२२ पर्यंत ६२ वर्ष व दिनांक ३१ मे, २०२३ पर्यंत ६० वर्ष असे वाढविण्यात आलेले आहे.
६. वैद्यकीय अधिकारी गट-ब हे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) नुसार ५८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच सेवानिवृत्त होतात.
(३) हे खरे आहे.
(४) वैद्यकीय अधिकारी गट ब ची ज्येष्ठता सुची व बिंदुनामावली तयार करण्याचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नागपूर शहरात हवेतून ऑक्सीजन शोषून बंद प्लांट सुरु करण्याबाबत

(११) ३७९१२ (१३-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात कोरोनाच्या दोन लाटांची गंभीरता लक्षात घेऊन हवेतून ऑक्सीजन शोषून घेणाऱ्या २६ प्लांट पैंकी ७ पीएसए प्लांट बंद असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागासाठी मार्च, २०२० मध्ये मंजूर झालेले दोन ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग प्रकल्प अद्यापही पूर्ण झाले नसल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन मागील वर्षी हे प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची ग्वाही न्यायालयाला देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशभरात कोरोनाची तिसरी लाट सुरु असल्याने बंद असलेले ऑक्सीजनचे प्लांट व ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग प्रकल्प तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही,
नागपूर शहरातील शासकीय कोविड रुग्णालयांमध्ये एकून १५ पीएसए प्लांट पैकी सर्व १५ पीएसए प्लांट कार्यान्वित आहे.
(२) हे खरे नाही.
नागपूर जिल्हयात उमरेड एम.आय.डी.सी. व सावनेर एम.आय.डी.सी. येथे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण दोन ऑक्सीजन सिलींडर रिफीलींग प्रकल्प (क्रायोजेनिक ऑक्सीजन जनरेशन प्लान्ट किंवा ए.एस.यु.-एअर सेपरेशन युनिट) पूर्ण झालेले आहेत. सदर प्रकल्पाना विद्युत मीटर मिळाल्यानंतर माहे जून २०२२ अखेर पर्यन्त प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत.
सदर प्लांटकरिता पुरवठादार मेसर्स आर्क्टिक्ट इन्फ्राटेक सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड, नागपुर यांना दिनांक ०९/०६/२०२१ रोजी जिल्हा शल्य चिकीत्सक, नागपुर यांच्या मार्फत वर्क ऑर्डर देण्यात आलेली होती. सदर वर्क ऑर्डरच्या दिनांकपासून पुढील २ महिन्यामध्ये प्लांट डेलिव्हरी देणे व त्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत प्लांट इस्टॉलेशन करणे अपेक्षित होते.
तसेच यासंदर्भात दिनांक १६ मे २०२१ रोजी मा. उच्च न्यायालय नागपुर बेंच, नागपुर यांच्या Suo- Moto PIL No. ४ of २०२० बाबत प्रतिवादी क्र.६ या अनुषंगाने, मा. जिल्हाधिकारी नागपुर यांनी सादर केलेल्या शपथपत्रामध्ये नमूद मुद्दा क्र.१६ अन्वये, उमरेड एम. आय. डी. सी व सावनेर एम. आय. डी. सी येथील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प पूर्ण करण्याकरिता वर्क ऑर्डरचा दिनांकपासून १६ आठवड्याची मुदत देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.
सदर प्लांटकरिता उमरेड एम. आय. डी. सी कडून जमीनीचा ताबा दिनांक २९/११/२०२१ रोजी व सावनेर एम. आय. डी. सी कडून जमीनीचा ताबा दिनांक २९/०१/२०२२ रोजी देण्यात आला. त्यानंतर प्लांट उभारणीचे काम प्रत्यक्षात सुरू करणे शक्य झाले. सद्यस्थितीत उमरेड व सावनेर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असून विद्युत मीटर मिळाल्यानंतर माहे जून २०२२ अखेरपर्यंत प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत.
(३) नागपूर शहरात शासकीय कोविड रुग्णालयांमध्ये एकूण १५ पीएसए प्लांटपैकी सर्व १५ पीएसए प्लांट कार्यान्वित आहेत. उमरेड एम.आय.डी.सी. व सावनेर एम.आय.डी.सी. येथील ऑक्सीजन सिलींडर रिफीलींग प्रकल्पांचे काम पूर्ण झालेले आहे.
सदर प्रकल्पाना विद्युत मीटर मिळाल्यानंतर माहे जून २०२२ अखेर जाने पर्यंत प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आरोग्य कर्मचारी, फ्रंटलाईन वर्कर्स व सहव्याधी असलेल्या
जेष्ठ नागरिकांना कोरोनाची प्रतिबंधक बूस्टर डोस देण्याबाबत.

(१२) ३७९३८ (१३-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाची तिसरी लाट सुरू झाली असून त्यापासून संरक्षणासाठी आरोग्य कर्मचारी, फ्रंटलाईन वर्कर्स व सहव्याधी असलेल्या ६० वर्षांपुढील नागरिकांना बूस्टर डोस दिला जाणार असल्याचे माहे जानेवारी २०२२मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) व (२) होय हे खरे आहे.

दि. १० जानेवारी, २०२२ पासून आरोग्य कर्मचारी, फ्रंटलाईन वर्कर्स व सहव्याधी असलेल्या ६० वर्षावरील नागरिक, ज्यांनी कोविड-१९ लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत अशांना आणखी एक डोस (प्रिकॉशन डोस) दिला जात आहे. हा प्रिकॉशन डोस दुसरा डोस घेतलेल्या तारखेपासून ९ महिने पूर्ण झाल्यानंतर दिला जात आहे.

सहव्याधी असलेल्या ६० वर्षावरील नागरिकांना त्यांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने हा डोस देण्यात येत होता. तथापि, दि. १६ मार्च, २०२२ पासून ६० वर्षावरील सर्व नागरिकांना प्रिकॉशन डोस देण्यात येत आहे.

दि. १३ जून, २०२२ पर्यंत ४,१२,५५० आरोग्य कर्मचारी व ५,२४,६३२ फ्रंटलाईन वर्कर्स तसेच ६० वर्षावरील १८,३१,८०२ नागरिकांना प्रिकॉशन डोस देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सुटाळा बुद्रुक व मौजे ढोरपगाव (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत

(१३) ३७९९२ (१३-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुटाळा बुद्रुक व मौजे ढोरपगाव (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनी, खामगाव यांनी पत्र क्रमांक ए४/२०२१/१४५ दिनांक १६/ ८/ २०२१ व पत्र क्रमांक विसस/ए४/२३४ दिनांक २२/१२ /२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आरोग्य केंद्र मंजूर करणे बाबत मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग, यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव अद्याप पर्यंत सादर न करण्याचे कारण काय आहेत,

(४) असल्यास, मौजे सुटाळा बुद्रुक व मौजे ढोरपगाव येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, मुंबई यांच्याकडून दि.१२.०५.२०२२ च्या पत्रान्वये प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापणा व श्रेणीवर्धन करण्यासाठी आरोग्य संस्थांचा नवीन बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद बुलढाणा यांनी खामगाव तालुक्यात मोजे सुटाळा बुद्रुक व मौजे ढोरपगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार सदर प्रस्तावाची छाननी करुन निकषात बसत असल्यास नवीन बृहत आराखड्यामध्ये प्रस्तावीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

निफाड तालुक्यातील आरोग्य विभागाची पदे रिक्त असलेबाबत

(१४) ३८३२७ (२४-०४-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या धोरणाप्रमाणे ३० हजार लोकसंख्या असलेल्या ठिकाणी एक आरोग्य केंद्र तर ५ हजार लोकसंख्या असलेल्या ठिकाणी १ उपकेंद्र असे निकष असतांना निफाड (जि.नाशिक) तालुक्यात केवळ १० आरोग्य केंद्रे तर ५२ उपकेंद्र कार्यान्वित आहेत तसेच येथील आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी ६ पदे, औषध निर्माण अधिकारी ३ पदे, आरोग्य सहायिका ३ पदे, आरोग्यसेविका २१ पदे, आरोग्यसेवक ३ असे विविध पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या तालुक्यात शिंगवे व वर्हेदाराना या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपकेंद्र मंजूर करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक १३ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथे नव्याने स्थापन झालेल्या ग्रामीण रुग्णालयात अद्यापही पदनिर्मिती झाली नसल्याने सदरची पदे तात्काळ भरणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,सार्वजनिक आरोग्य विभागाचे शा.नि.क्र.पदनि-२०२०/प्र.क्र.४४/आरोग्य-३, दि.७.६.२०२१ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने सदरचे पदे भरणेबाबत तसेच लोकसंख्येच्या निकषानुसार आरोग्य केंद्र व प्राथमक आरोग्य केद्र स्थापन करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मौजे शिंगवे व वऱ्हेदाराना येथे उपकेंद्र मंजूर करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद स्तरावर असून जिल्हा नियोजन समिती/जिल्हा परिषद सर्वसाधारण समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) ग्रामीण रूग्णालयासाठी पदनिर्मिती करण्यात आली असून रूग्णालयाची इमारत आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत झालेली नाही. तसेय रूग्णालयाला साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे

(४) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोडबृहत आराखड्याद्वारे नवीन आरोग्य संस्था मंजूरीसाठी कार्यवाही सुरू आहे.

(५) कार्यवाही सुरू आहे

सफाळे (जि.पालघर) येथील आरोग्य केंद्रात महिलांसाठी होत असलेले कुटुंबकल्याण नियोजन शिबीर बंद असल्याबाबत.

(१५) ३९००५ (२४-०४-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (जि.पालघर) येथील आरोग्य केंद्रात महिलांसाठी होत असलेले कुटुंबकल्याण नियोजन शिबीर मागील वर्षभरापासून बंद असून परिणामी तेथील महिलांना वसई, विरार व पालघर येथे जाऊन कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घ्यावी लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शल्यचिकित्सक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभावी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया बंद असल्यामुळे गरीब व गरजू महिलांना शारीरिक, मानसिक व आर्थिक हाल होत असल्यचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले ,

(४) असल्यास, त्यानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) प्राथमिक आरोग्य केंद्र, सफाळे, जिल्हा पालघर येथे माहे फेब्रुवारी २०२१ पासून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया सत्र आयोजित करण्यात आलेले नाही, हे खरे आहे. तथापि, या आरोग्य केंद्रात मार्च, २०२२ मध्ये ८ शिबिरात १४७ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

याशिवाय प्राथमिक आरोग्य केंद्र, सफाळे जिल्हा पालघरच्या कार्यक्षेत्रातील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी ईच्छुक लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रिया शासकिय वाहनाने ने-आण करुन उपजिल्हा रुग्णालय डहाणू, ग्रामीण रुग्णालय वानगांव, प्राथमिक आरोग्य केंद्र मलवाडा, नवघर व एडवण येथे करण्यासाठी नियोजन करुन करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत रुग्णालये व दवाखाने यामध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचे थकीत मानधन अदा करण्याबाबत

(१६) ३९१३८ (२४-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून मुख्यलेखा शीर्ष २२१०(हस्तांतरीय योजना) या लेखाशीर्षामधील ०१४६ अंतर्गत (१०) मुसफल क्षेत्रातील अध्यापनेतर रुग्णालये व दवाखाने (१०) तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांचे माहे जून २०२१ ते डिसेंबर, २०२१ या सात महिन्यांचे मानधन अद्याप अदा करण्यात आले नसल्याचे दि. २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैद्यकीय अधिकारी हे कोवीड-१९ च्या आपातकालीन परिस्थितीत सेवा देत असल्यामुळे त्यांना मानधन अदा करणे गरजेचे असल्याने त्याबाबत रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून रक्कम रुपये १,४०,४०,०००/- (रुपये एक कोटी चाळीस लाख चाळीस हजार फक्त) रुपयाचे अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव उपसंचालक, आरोग्यसेवा,कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर, मा. संचालक, आरोग्य सेवा मुंबई तसेच प्रधान सचिव, सार्व. आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचकडे रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून दि. २४ सप्टेंबर, २०२१ व दि. २० डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोव्हीड-१९ च्या आपातकालीन परिस्थितीतील सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा लक्षात घेता त्यांचे माहे जून ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत थकीत मानधन अदा करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांचे माहे जून २०२१ ते डिसेंबर २०२१ या सात महिन्यांचे मानधन दिनांक ३०.१०.२०२१, १६.०१.२०२२ व दि.१४.०२.२०२२ रोजी अदा करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) जून ते डिसेंबर, २०२१ या कालावधीचे थकीत मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ताखाड (ता. चाळीसगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामात अनियमतता असल्याबाबत.

(१७) ३९४३९ (१३-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताखाड (ता. चाळीसगाव) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, वर्ग-३ चे निवासस्थान युनिट-१ चे बांधकामासाठी बांधकाम विभाग, जिल्हा परिषद जिल्हा जळगाव यांनी सन २०१७-१८ मध्ये रु. १०,२२,५०३/- खर्च करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामात बरीच अनियमतता असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या साठी बांधकाम ठेकेदारास रु. २५,८७३/- अतिप्रदान झाले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अतिप्रदान रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१७-१८ मधिल लेखापरिक्षणामध्ये रु.२५,८७४ एवढे अतिप्रदान झाल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला असून प्रत्यक्षात रु.२८५७.६८ एवढी रक्कम वसूली पात्र आहे. असे जिल्हा परीषद बांधकाम विभागाने कळविले आहे.
(४) वसूलीची कार्यवाही कार्यकारी अभियंता जिल्हा परीषद बांधकाम विभाग यांच्यामार्फ़त सुरू आहे.
(५) कार्यवाही सुरू आहे.

चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्याततील कोव्हिड १९ काळात कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त न करण्याबाबत.

(१८) ३९७०१ (२४-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात सद्यस्थितीत कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून निर्बंध लावण्यात आलेले असुन जनतेला आरोग्य सेवा पुरवावी यासाठी शासनाने जिल्हा व तालुका स्तरावर मानधन तत्वावर कंत्राटी स्वरूपात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्त्या केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भविष्यात तिसरी लाट आल्यास त्याचे गंभीर परिणाम जिल्ह्याला भोगावे लागू शकतात या पार्श्वभूमीवर मा.मुख्यमंत्री यांच्या VC मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार कोविड -१९ अंतर्गत भरती करण्यात आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना राज्यस्तरावरून कार्यमुक्त करण्याच्या सूचना आल्याशिवाय कार्यमुक्त करू नये तसेच तोपर्यंत त्यांना इतर सेवांमध्ये समायोजित करण्यात यावे असे आदेश देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वतःचा जीव धोक्यात घालून सदर कर्मचारी यांनी गेली दीड वर्ष रुग्णांची सेवा केली असून कोणतीही पूर्वसूचना न देता, चर्चा न करता कोरोनाचा प्रभाव कमी होताच जिल्हा प्रशासनाच्या वतीने दि.२ जुलै,२०२१ रोजी सायंकाळी आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक जळगाव यांनी चाळीसगाव तालुक्यातील तब्बल ३९ वैद्यकीय कर्मचारी यांना सेवा समाप्तीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कर्मचा-यांना अचानकपणे कार्यमुक्त करण्यात आले असल्याने त्याच्यावर बेरोजगारीची वेळ आल्याने त्यांना पूर्ववत कामावर घ्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री यांना माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोविड-१९ साथ प्रादुर्भाव कमी झालेल्या ठिकाणी ॲक्टीव्ह रुग्णांच्या संख्येनुसार अतिरिक्त कंत्राटी कर्मचारी कमी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार ॲक्टीव्ह रुग्णांची संख्या कमी झालेल्या जिल्ह्यातील अतिरिक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत.
(४) हे खरे आहे.

(५) कोविड-१९ साथीमध्ये रुग्णसंख्येमध्ये कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या रुग्णांना उपचार देण्यासाठी उपलब्ध आरोग्य कर्मचारी कमी पडल्यामुळे साथ सुरु असेपर्यंत कंत्राटी कर्मचारी नेमण्यात आले. साथीचे रुग्ण कमी होताच अतिरिक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा कमी करण्यात आल्या.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हयातील जिल्हा सामान्य रग्णालयात कोरोना नियमांचे उल्लंघ्न होत असल्याबाबत

(१९) ४०२११ (२४-०४-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयात कोरोना नियमांचे उल्लंघ्न होत असून गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी तेथे कोणताही सुरक्षा रक्षक दिसून येत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पूर्व विदर्भातील नागपूर विभागात गर्भपाताचे प्रमाण अधिक असल्याबाबत.

(२०) ४०२५३ (२४-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील नागपूर विभागात माहे एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये जवळपास आठ हजार पेक्षा जास्त गर्भपात करण्यात आल्याची माहिती माहिती आरोग्य उपसंचालक, नागपूर यांनी माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्या दरम्यान दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही गर्भपात होण्याची कारणे काय आहेत ,
(३) तसेच, मागील वर्षी राज्यभरात विशेषतः पश्चिम विदर्भातील बुलडाणा जिल्ह्यात किती गर्भपात करण्यात आले व त्याची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

पूर्व विदर्भातील नागपूर विभागाअंतर्गत येणा-या जिल्हे व महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील मान्यताप्राप्त गर्भपात केंद्रामध्ये वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत तरतुदीनुसार वैद्यकीय गर्भपातास पात्र असलेल्या एकुण १६,२४३ गरोदर महिलांचे माहे एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये वैद्यकीय गर्भपात करण्यात आलेले आहेत.
(२) वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मधील तरतुदीनुसार जर गरोदरपण पुढे सुरु ठेवल्यास गर्भवती महिलेच्या जीवीतास धोका होणार असल्यास किंवा तिच्या मानसिक अथवा शारीरिक आरोग्यास गंभीर इजा किंवा दुखापत होणार असल्यास किंवा जन्मास येणा-या बालकास शारीरिक अथवा मानसिक व्यंगामुळे गंभीर अपंगत्व येण्याचा धोका असल्यास सदर गर्भवती महिलेचा वैद्यकीय गर्भपात करण्यास मान्यता आहे.

त्यानुसार पूर्व विदर्भातील नागपूर विभागाअंतर्गत करण्यात आलेले वैद्यकीय गर्भपात कायद्यातील तरतुदीनुसार करण्यात आलेले आहेत.

(३) वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मधील तरतुदीनुसार माहे एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये आयएचआयपी पोर्टलवरील आकडेवारीनुसार राज्यामध्ये एकूण ९२,७६७ वैद्यकीय गर्भपात करण्यात आलेले आहेत.

तसेच वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मधील तरतुदीनुसार माहे एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये बुलडाणा जिल्हयात एकुण ३४०५ वैद्यकीय गर्भपात करण्यात आलेले आहेत. सदर वैद्यकीय गर्भपात हे महिलेच्या जीवीतास धोका असल्यामुळे, महिलेच्या शारीरिक आरोग्यास गंभीर इजा होणार असल्यामुळे, गर्भनिरोधक साधनाचा वापर करुनही गर्भधारणा झाल्यामुळे इ. कारणांस्तव करण्यात आलेले आहेत.

रायपूर (ता. जि . बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयास मान्यता देणेबाबत

(२१) ४०४३४ (२४-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपूर (ता. जि . बुलढाणा) या गावास लागून २५ खेडेगावे असून तेथे हिंदु मुस्लिमांचे प्रसिद्ध असलेले सैलानी हे तीर्थक्षेत्र असून येथे दररोज मोठया संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायपूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून ते त्याठिकाणच्या लोकसंख्येच्या मानाने अपुरे पडत असल्याने येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ सप्टेबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलडाणा आणि दि ६ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास मा. आरोग्यमंत्री यांच्या कडे केली आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निकषात बसत असल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बहुउददेशीय आरोग्य कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात

(२२) ४०५२२ (२४-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुउददेशीय आरोग्य कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात लोकप्रतिनिधिं दिनांक २१ जून २०२१ रोजी वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,आरोग्य कर्मचा-यांनी सार्वजनिक आरोग्य वितर्गत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी एमपीडब्ल्यूतील ५० टक्के पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षांचा निकाली जाहिर करुन निवड प्रक्रिया पूर्ण करावी, सार्वजनिक आरोग्य विभाग व ग्रामविकास विभागांतर्गत एमपीडब्ल्यूतील ५० टक्के पदासाठी २०२१ मधील महापरिक्षा पोर्टकडील अर्जदारांना संधी दयावी, कोविड काळात अपूरे मनुष्यबळ असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात काम देणेत यावे, वयोमर्यादा उलटून गेलेल्या कर्मचा-यांना अंशकालिन दर्जा देण्याबाबत शासन निर्णय व्हावा, सन १९९६ पासून हिवताप विभागात कार्यरत हंगामी क्षेत्र कर्मचा-यांना कायम नोकरी मिळण्यासाठी वयोमर्यादेत ३ वर्षाची वाढ करावी आदि मागण्यां केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बहुउददेशीय आरोग्य कर्मचा-यांच्या मागण्यांसदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) राज्यातील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात लोकप्रतिनिधी यांचे दि.२०.०५.२०२१ रोजी मा.मंत्री (आरोग्य) यांना दिलेले पत्र विभागास प्राप्त झाले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) १. दि.२८.०२.२०२१ रोजी एमपीडब्ल्यूतील ५० टक्के पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेद्वारे पात्र उमेदवारांमधून समुपदेशनाद्वारे निवड प्रक्रिया काही जिल्हयांमध्ये पूर्ण झाली असून काही जिल्हयांची हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे पडताळणी पूर्ण होण्याची कार्यवाही सुरू असून अद्याप पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरू आहे.
२.सार्वजिनक आरोग्य विभागातील आरोग्य सेवक पदाच्या तात्कालीन सेवाप्रवेश नियमानुसार विहीत शैक्षणिक अर्हताप्राप्त हंगामी फवारणी कर्मचारी यांच्या मधून ५० टक्के सरळसेवेने सर्व साधारण उमेदवारांमधून ४० टक्के व १० टक्के क्षेत्र कर्मचारी पदोन्नतीने सेवेत प्रविष्ठ होण्याचे प्रावधान होते.सदर सेवाप्रवेश नियम अधिसुचना अधिक्रमीत करण्यात आली असून दि.२९.०९.२०२१ च्या सेवाप्रवेश नियम अधिसुचनेनुसार शालांत परिक्षा उत्तीर्ण असलेल्या पात्र हंगामी फवारणी कर्मचारी यांना क्षेत्र कर्मचारी पदासाठी ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.
३. हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी म्हणून ९० दिवस काम केलेल्या उमेदवारांना वयोमर्यादा ४५ पर्यंत शिथिल करण्यात होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथील रिक्त पदे भरण्याबाबत.

(२३) ४०५२९ (२४-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे वर्ग -१ संवर्गातील एकूण १९ पदे मंजूर असून त्यापैकी सद्यस्थितीत १७ पदे रिक्त तसेच उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय स्तरावर वर्ग -१ संवर्गातील वैद्यकिय अधिक्षकांची एकूण ११ पदे मंजूर असून त्यापैकी ९ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी , २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदामुळे आरोग्य सेवेवर त्याचा परिणाम होत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रत्नागिरी जिल्हयाकरिता विशेष बाब म्हणून वर्ग - १ संवर्गातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी अथवा रिक्त पदांच्या जागी वर्ग -२ संवर्गातील वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती मुलाखतीद्वारे जिल्हा स्तरावर भरण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती जिल्हा शल्य चिकित्सक ,रत्नागिरी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ जूलै २०२१ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असलयास, जिल्हा रुग्णालय ,रत्नागिरी येथे रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत खरे आहे.
जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर जिल्हाधिकारी यांचे मार्फत पदे भरण्यात आलेली असून जिल्हा रुग्णालय रत्नागिरी व अधिपत्याखालील उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालयामध्ये एकूण १८ वैद्यकिय अधिकारी कंत्राटी स्वरुपात कार्यरत आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे एकूण ०८ विशेषज्ञ कार्यरत असून त्यांच्यामार्फत रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वर्ग-१) (वेतनस्तर एस-२३) मधील रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कोरोना लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना.

(२४) ४०५६८ (२४-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला वर्षे पूर्ण झाले तसेच कोरोनाची तिसरी लाट आली असूनही अद्यापही अनेक नागरिकांचे लसीकरणाचे दोन्ही डोस झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नांदेड आरोग्य विभागाच्या नोंदीनुसार शहरातील १ लाख ४८ हजार २४२ तसेच जळगाव जिल्हयातील ६ लाख ६५ हजार पात्र लाभार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधक लसीचा पहिला डोसही घेतला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी लसीकरणाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) दि.१३.६.२०२२ पर्यंत राज्यातील पात्र नागरीकांपैकी ९२.३४ टक्के नागरीकांनी कोविड-१९ लसीचा पहिला डोस घेतला आहे.

(२) हे खरे आहे.

नांदेड जिल्हयात ५,७०,०४६ व जळंगाव जिल्हयातील ६,२५,५८० पात्र लाभार्थीनी पहिला डोस घेतला नसल्याचे दिनांक १३ जून, २०२२ अखेर दिसून आले आहे.

(३) कोविड-१९ लसीकरण १०० टक्के करण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

• कोविड १९ लसीकरण कमी असलेल्या गावांनी वॉर्डाची यादी करुन प्राधान्याने अशा गावातील लसीकरण सत्रांचे आयोजन.
• जिल्हा/मनपा/तालुकास्तरावर टास्क फोर्स बैठकांचे आयोजन
• सुक्ष्मकृती नियोजन आराखडयाच्या मदतीने लसीकरण सत्रांचे आयोजन व अंमलबजावणी.
• घरोघरी एएनएम, एमपीडब्ल्यू, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती यांच्याद्वारे घरभेटी देऊन कोविड लसीकरणासाठी पाठपुरावा.
• लसीकरण सत्रांची संख्या वाढविणे तसेच लाभार्थ्यांसाठी सत्रांचे आयोजन सोईच्यावेळी करणे.
• कोविन प्रणालीच्या सहाय्याने डयूलिस्टचा वापर)लाभार्थ्यांची यादी दुसरा डोस राहिलेल्या)
• लाभार्थ्यांना लसीकरण सत्राच्या ठिकाणी नेण्यासाठी वाहतूकीची सोय करणे.
• व्यापक प्रमाणात लसीकरणाची प्रसिध्दी करणे तसेच सोशल मिडीयाचा वापर करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करणे.
• इतर शासकीय विभागांचा कोविड लसीकरणात सक्रिय सहभाग.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुरूंगवाडी (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथील कालूस्ते प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत असलेल्या आदिवासी महिलांना मातृत्व अनुदानापासून वंचित असल्याबाबत

(२५) ४०६१७ (२४-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरूंगवाडी (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत असलेल्या आदिवासीं गेल्या चौदा महिन्यांपासून मातृत्व अनुदानापासून वंचित असल्याने येथील महिलांनी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी भागात गरोदर महिलांना सकस आहार मिळत नाही व शासनाने दिलेले मातृत्व अनुदान त्यांच्यापर्यंत पोहोचत नसल्यामुळे आदिवासी भागात कुपोषित बालकांमध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरोदर महिलांना मातृत्व अनुदान वेळेवर मिळण्याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (२१-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
मौजे कुरुंगवाडी (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथील ६ महिला प्राथमिक आरोग्य केंद्र, कालुस्तेच्या वैद्यकीय अधिकारी यांना भेटल्या व मातृत्व अनुदान मिळाले नसल्याबाबत तक्रार केलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२१-२२ मध्ये इगतपुरी तालुक्यात ३८९ मातांना मातृत्व अनुदान लाभ देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयी-सुविधांचा असलेला अभाव.

(२६) ४०९६३ (२४-०४-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांच्या कमतरतेमुळे आरोग्य सेवा सुरळित होत नसुन ग्रामीण रुग्णालयांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी आढावा घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
गोंदिया जिल्ह्यातील ४० प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. यामध्ये गट अ चे ७६ पदे मंजूर असून ७६ पदे भरलेली आहेत. तसेच गट ब चे ५४ पदे मंजूर असून पैकी ३७ पदे भरलेली आहेत तर १७ पदे रिक्त आहेत. गोंदिया जिल्ह्यात १० ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहेत. ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
(२) जिल्हा व तालुका स्तरावरुन नियमितपणे आढावा घेतला जातो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनगांव सुर्जी (जि.अमरावती) येथील ५० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाबाबत

(२७) ४१२७४ (२४-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगांव सुर्जी (जि.अमरावती) येथे ५० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाकरिता निधीची तरतूद मंजुर करण्यात आली असली तरी सदरहू प्रस्तावित रुग्णालयाबाबत अद्याप पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ग्रामीण तथा उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रस्तावित जागा ही अतिक्रमणात असल्यामुळे ती मोकळी करण्यासाठी नगर परिषद स्तरावरुन कार्यवाही करुन तसा ठराव पारित करुन शासनाकडे अहवाल पाठविण्यात आला आहे परंतू सदरहू अतिक्रमणधारक हे न्यायालयात गेले असुन याबाबत मागील १५ वर्षापासून शासन कोणतीही कार्यवाही

करु शकले नाही परिणामी या रुग्णालयाचा ज्या नागरिकांना फायदा मिळणार आहे ते वैद्यकीय सुविधाविना वंचित असुन त्याना खाजगी रुग्णालयात स्वखर्चाने उपचार घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
अंजनगाव सुर्जी (जि. अमरावती) येथे ५० खाटांच्या श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या बांधकामास २३१६.५७ लक्ष रकमेस अल्पसंख्यांक विकास विभागाने शासन निर्णय दि.२६.०४.२०२२ अन्वये प्रशासकिय मान्यता दिली आहे.
(२) रुग्णालयासाठी अतिरीक्त जागा अतिक्रमणात आहे हे खरे आहे. मात्र ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुर्जी पुर्णपणे कार्यान्वित असून रुग्णांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहे.
(३) सदर श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या जागेची उपलब्धता झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथील महिला प्रसूती कक्षाच्या दुरवस्थेबाबत

(२८) ४१९५४ (२४-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथील महिला प्रसुति कक्षाच्या दुरवस्थेसंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांनी सुरक्षारक्षक व कर्मचारी यांना ज्ञापन देऊन खुलासा मागविण्यात आलेला असुन खुलासा प्राप्त होताच पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षारक्षक व कर्मचारी यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबधित सुरक्षारक्षक व कर्मचारी यांच्यावर कोणती प्रशासकीय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३)प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

प्राथमिक आरोग्य केंद्र येसुर्णा (ता. अचलपूर) येथील आरोग्य केंद्र व निवासस्थान बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(२९) ४१९८९ (१२-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक आरोग्य केंद्र येसुर्णा (ता अचलपूर) येथील आरोग्य वर्धिनिचा लोकार्पण सोहळा दिनांक २६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्र व निवासस्थान इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे स्थानिक लोकप्रतीनिधी, जिल्हा परिषद अध्यक्ष , जिल्हा आरोग्य अधिकारी , तालुका आरोग्य अधिकारी यांच्या प्रत्यक्ष पाहणी दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट बांधकाम करण्या-या संबंधीत कंत्राटदार , अभियंता यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) : (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्यय विभागांतर्गत कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना वेतन मिळालेले नसल्याबाबत

(३०) ४२३९१ (२४-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत येणा-या ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५६ कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना माहे जुलै,२०२१ पासून वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, वेतनास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त वैद्यकीय अधिका-यांचे वेतन तात्काळ अदा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी तत्वावर नियुक्त वैद्यकीय अधिकारी यांचे मानधन माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंत अदा करण्यात आले आहे. मार्च, २०२२ पासुनचे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३), (४) व (५) मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

रावेर (जि.जळगाव) येथील ग्रामीण रूग्णालयस उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा मिळणेबाबत

(३१) ४२६०५ (१२-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर(जि. जळगाव) हे तालुक्याचे ठिकाण असून येथील २४ गावे आदिवासी क्षेत्रातील असून या तालुक्यातील ४ रेल्वे स्थानके आहेत तसेच बऱ्हाणपूर- अंकलेश्वर महामार्गावरील परिसरात अनेकदा अपघात होत असतात तसेच हतनूर धरणाच्या बँकवाटरमुळे नागरीकांचा बुडून मृत्यृ होत असल्याच्या घटना देखिल घडत असतात तथापि येथील ग्रामीण रूग्णालयातील अपूऱ्या सायी- सुविधामुळे वेळेवर उपचार मिळत नसल्यामुळे रूग्णांचा मृत्यू होत असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी लोकप्रतिनिधींनी ग्रामीण रूग्णालयाला उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा मिळणेसाठी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने रावेर येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
अपघाताच्या घटना होतात मात्र ग्रामीण रुग्णालय रावेर येथे उपलब्ध उपचार करण्यात येतात व आवश्यकतेनुसार संदर्भित करण्यात येते.

(२) हे खरे आहे.
(३) सन २०११ जनगणनेवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापना व श्रेणीवर्धन करण्यासाठी आरोग्य संस्थांचा जोड- बृहत आराखडा तयार करण्यात येत असून त्यानुसार सदर संस्था निकषात बसत असल्यास जोड- बृहत आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्याची कार्यवाही करता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील बालकांना दुर्धर आजाराने ग्रस्त असल्याबाबत

(३२) ४२८०५ (१३-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयाच्या ग्रामीण भागातील ५१८० बालकांना जन्मत:च विविध दुर्धर अजारांनी ग्रासले असल्याचे जिल्हा परिषदेच्या आरोग्य आणि महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या संयुक्त पाहणीतून माहे जानेवारी, २०२२ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ग्रामीण भागातील बालकांना जन्मत:च होणारे दुर्धर आजार पुर्ण बरे करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (२२-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषदेच्या आरोग्य आणि महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या संयुक्त तपासणीमध्ये ५१८० बालके जन्मत: दुर्धर आजारी नसून त्यांना विविध आजार यामध्ये त्वचारोग, नेत्ररोग, कर्णदोष, कृमीदोष इ. दोष असलेली बालके आहेत. त्यांची तपासणी तज्ञांकडून केली असता २०८२ बालके या व्याधीची आढळून आली व त्यांच्यावर आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत.
(२) व (३) २०८२ पैंकी अस्थीरोग- ७, हार्निया-१५, अपेंडिक्स-२, क्लेफ्ट लीप ॲण्ड पॅलेट- ९, कान, नाक, घसा, किडनी-१, हृदयविकार- ४६ व इतर शस्त्रक्रियेचे-३० असे एकूण ११८ बालकांना शस्त्रक्रियेची आवश्यकता होती. त्याचे नियोजन करुन ११८ बालकांची शस्त्रक्रिया व १९६४ बालकांवर उपचार करण्यात आले. यामध्ये त्वचादोष, नेत्रदोष व कर्णदोष या बाबींचा समावेश होता. त्यांच्यावर वैद्यकीय तज्ञांमार्फत उपचार करण्यात आलेले असून आज रोजी सर्व बालकांवर उपचार पूर्ण झालेले आहेत. आरोग्य तपासणीमध्ये ग्रामीण भागातील आजारी असलेल्या बालके/ विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालयामध्ये पुढील उपचारासाठी पाठविले जाते व तेथे तज्ञांमार्फत त्यांच्यावर आवश्यक ते उपचार अथवा शस्त्रक्रिया केल्या जातात. तसेच दुर्धर असणाऱ्या शस्त्रक्रिया राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विविध हॉस्पिटल्सबरोबर सामंजस्य करार झालेल्या हॉस्पिटल्समध्ये तसेच महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेमधून मान्यता प्राप्त रुग्णालयामधून करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोखंडी सावरगाव (ता.अंबाजोगाई,जि.बीड) येथे स्त्री रुग्णालय व वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्रामध्ये पद भरती करण्याबाबत

(३३) ४३०५६ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोखंडी सावरगाव (ता.अंबाजोगाई,जि.बीड)येथे १०० खाटाचे स्त्री रुग्णालय व वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र असून येथे एकही शिपाई व सुरक्षा रक्षक नसून रुग्णालया कडून वर्ग -३ व वर्ग -४ चे कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे एकही शिपाई व सुरक्षा रक्षक नसल्यामुळे कोट्यावधी रुपये खर्चून उभारलेली ईमारतीत अस्वच्छता पसरली असून रुग्णालयाचे समान उघड्यावर पडले असून कोरोना काळात मराठवाड्यातील सर्वात मोठे व सुंदर रुग्णालय म्हणून याची ओळख झाली परंतू सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केल्याने येथील कार्यरत डॉक्टर यांना बेड उचलावे लागत असून परिचारिका यांना साफसफाई करावी लागत असल्याने येथे वर्ग -३ व वर्ग -४ चे कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच कुशल व अकुशल (बाहयस्त्रोता मार्फत) कर्मचारी त्वरित भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,येथे अ.ब.क. संवर्गातील नियमित पदे, काल्पनिक कुशल व काल्पनिक अकुशल असे एकूण ३१ पदे मंजूर करण्यात आलेली असुन सदर पदे अद्याप भरण्यात आलेली नसल्यामुळे रुग्णालयात शस्त्रक्रिया होत नाहीत त्यामुळे या बाबत रुग्णालय व स्थानिक लोप्रतिनिधी हे शासनाकडे वारंवार पत्र व्यवहार व पाठपुरावा करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, यांनी पत्र.क्र.आआसे/माआ/टे-४/पदभरती/८०९२-९९. दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ अन्वये संचालक, आरोग्य सेवा, पुणे-२. यांना तातडीने वरील रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत
कळवले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) हे अशंत: खरे आहे.
वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्राकरिता सुरक्षा रक्षक सेवा सुरू करण्यास शासन निर्णय क्र.सुरक्षा २०२१ /प्र.क्र.१५१/आ-३अ, दि.१४.०६.२०२१ अन्वये ०९ सुरक्षा रक्षकांची सेवा मेस्को यांचेकडून घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, वर्ग ३ व वर्ग -४ संवर्गाची सन २०२१ ची पदभरती प्रक्रिया दि.२९.०६.२०२२ रोजी रद्द करण्यात आली असून सुधारित पदभरती प्रक्रिया सुरू करण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई यांना पत्र देण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
वृध्दत्व आरोग्य वे मानसिक आजार केंद्र या रुग्णालयात बाह्यस्त्रोतांमार्फत कुशल व अकुशल कर्मचारी भरण्याबाबत निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना वर्ग -४ ची सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आठ कंत्राटी (वर्ग-४)कर्मचारी यांची सेवा उपलब्ध करून घेण्यात आली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि २०१८ /प्र.क्र१८५ /आ-४, दि.०६.०६.२०१९ अन्वये १०० खाटांच्या वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केद्रातकरिता वर्ग १ ते वर्ग-४ ची १२९ पदे मंजूर असून नियमित ४८ पदांपैकी ४१ पदे भरण्यात आलेली असून काल्पनिक कुशल व काल्पनिक अकुशल पदांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे. तसेच या रुग्णालयात शस्त्रक्रिया होत आहेत.
(४) हे खरे आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात खाजगी व शासकीय रुग्णालयांमध्ये सिझेरियनचे वाढते प्रमाण रोखण्याबाबत

(३४) ४३०६७ (१३-०४-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी व शासकीय रुग्णालयांमध्ये सिझेरियनचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी शासन निर्णय १५.१२.२०१७ अन्वये तज्ञांची समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीनने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालातील शिफारशीनुसार खासगी व शासकीय रुग्णालयांमध्ये सिझेरियनचे वाढते प्रमाण रोखण्याबाबत कोणत्या उपाययाजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
राज्यात सरकारी रुग्णालयांच्या तुलनेत खाजगी रुग्णांलयांमध्ये सिझेरियनचे वाढते प्रमाण रोखण्याकरीता दि. १५/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांची समिती गठीत करण्यात आली आहे.
(२) होय. समितीने शासनास अहवाल सादर केला असून समितीमार्फत केलेल्या शिफारशींचे स्वरुप खालीलप्रमाणे :-
१. FOGSI च्या सहाय्याने Robson''s criteria ची खाजगी हॉस्पीटल्समध्ये अंमलबजावणी करणे तसेच या हॉस्पिटल्सची माहिती Manyata कार्यक्रम अंतर्गत FOGSI च्या संकेत स्थळावर अद्ययावत करणे.
२. FOGSI यांच्यामार्फत सी सेक्शन करीता checklist देणे.
(३)
१. दि. २३/०५/२०१८ रोजी झालेल्या तज्ञ समिती बैठकीच्या शिफारशीनुसार शासकीय रुग्णालयामध्ये तसेच खाजगी संस्थेसाठी FOGSI मार्फत संस्था स्तरावर झालेल्या सिझेरियन सेक्शनचा आढावा घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
२. खाजगी स्त्री रोग तज्ञांना FOGSI मार्फत Modified Robson''s criteria चा वापर करुन आवश्यकतेनुसार सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
३. दि. १०/१०/२०१९ रोजी FOGSI यांना Robson''s criteria सुधारीत करणे व त्याबाबत सर्व सदस्यांना मार्गदर्शक सूचना कळविण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, येथे एम.आर. आय मशीन खरेदी बाबत

(३५) ४३१९२ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि. बीड. येथे जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून ३ Tesla MRI System with Turn Key with Transformar. Make- Philips Mode Ingenia Elition X. मशीन रु.१६ कोटी १५ लाख रुपयांना खरेदी केली असून सदर मशीन चे प्रत्यक्षात कोटेशन १३ कोटी ५० लाख रुपये असून MRI मशिन व प्रत्यक्ष कोटेशन या मध्ये तब्बल ०२ कोटी ६५ लाख रुपयांचा फरक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खरेदी व्यवहारात आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर खरेदी प्रक्रियंमध्ये शासनाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून या प्रकरणाची चौकशी करुन करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दि .१४ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारस केली होती हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, येथे MRI मशीन विथ टर्न-की चे (ईमारत बांधकामासह) टेंडर झालेले आहे परंतु सदर मशिन कार्यरत करण्याकरीता नवीन व अद्यावत ईमारतीचे बांधकाम असणे आवश्यक असताना जुन्या ईमारतीतच केबिनचे बांधकाम केले जात असुन तेथे MRI मशीन बसवली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मंजूर टेंडर प्रमाणे MRI मशीन साठी नवीन व अद्यावत ईमारत बांधण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दि. ०४ डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन (०६-१०-२०२२) :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) व (६) प्रश्न उदभवत नाही.

(दौंड, जि. पुणे) आरोग्य विभाग पंचायत समिती अंतर्गत रिक्त पदे भरणेबाबत

(३६) ४३४३६ (१३-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) आरोग्य विभाग, पंचायत समिती अंतर्गत वैद्यकीय अधिकारीचे १ पद, औषध निर्माण अधिकारीचे २ पदे, आरोग्य सेवक स्त्री १८ पदे अशी एकूण २१ पदे रिक्त असुन उक्त रिक्त पदे भरणेबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(१) तसेच, यवत (ता. दौंड, जि. पुणे) येथील ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर मधील दंतचिकित्सक अधिकारीचे १ पद, अधिपरिचारिका ३ पदे, कक्षसेवक ५ पदे, दंतचिकित्सक सहाय्यक १ पद, परिसेविका १ पद, सफाई कामगार २ पदे अशी एकूण १४ पदे रिक्त असून सदर पदे भरणेबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४ नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) १. वैद्यकीय अधिकारी, गट अ(एस २०) ची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत शा.नि.दि. ०२.०३.२०१५, दि.२१.०४.२०१५ व दि.०३.१२.२०१८ नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीस अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार वैद्यकीय अधिकारी गट अ (एस-२०) चे एक रिक्त पद कंत्राटी पध्दतीने भरण्यात आले आहे.
२. दंतशल्यचिकित्सक सारासे गट ब ची एकूण २८९ पदाची जाहीरात लोकसेवा आयोगामार्फत दि.१८.०२.२०२२ रोजी प्रसिध्द झालेली आहे.
३. प्राआके येथील गट क व ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
४. ग्रामीण रुग्णालय येथील कुशल/ अकुशल पदे निविदा प्रक्रियेने भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हयातील नवजात बालक, बालमृत्यू तसेच माता मृत्यू रोखण्याबाबत

(३७) ४३५३७ (१३-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील ग्रामीण तसेच आदिवासी पाडयामध्ये आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेच्यावतीने प्रयत्न केले जात असताना गेल्या दिड वर्षात ७४१ नवजात बालकांचा तर १२१ बालमृत्यू आणि ११५ मातामृत्यू झाल्याची नोंद आरोग्य विभागाकडे असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात बालकांसाठी असलेला आरोग्य राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम बंद झाल्यामुळे सदर टीममधील मनुष्यबळ व वाहने कोरोना रुग्णांसाठी देण्यात आल्यामुळे वाहनांची उपलब्धता नसणे, अंगणवाड्या बंद असणे त्यामुळे दुर्गम व आदिवासी पाडयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार होत नसल्यामुळे प्रसूती माता व बालकांना मुंबईत हलविण्यास सांगण्यात आले परंतू, त्यावेळी बस, रेल्वे, खाजगी वाहने व ॲम्ब्युलन्स अशा सोई-सुविधा मिळत नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्याची तक्रार मुरबाडच्या श्रमिक मुक्ती संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान मोहिमेंतर्गत राज्यातील अर्भक मृत्यूदर १० टक्क्यापर्यंत खाली आणण्याचे उद्दीष्ट निश्चित केले असतानाही अर्भक मृत्यूदराचे प्रमाण जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील नवजात बालके, बाल मृत्यू व माता मृत्यू रोखण्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गेल्या दीड वर्षात कोरोना काळात नवजात बालक, बालमृत्यू तसेच मातामृत्यूचे प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ठाणे जिल्हयातील नवजात बालक बालमृत्यू तसेच माता मृत्यूस परिणामकारक आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (२५-११-२०२२) : (१) हे खरे नाही. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण, तसेच आदिवासी पाड्यांमध्ये मागील दिड वर्षात (माहे ऑगस्ट २०२० ते जानेवारी २०२२) १५५ नवजात बालक, ५५ बालमृत्यू व १९ माता मृत्यू झालेले आहेत.
(२) कोरोना काळात राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मनुष्यबळाचा वापर हा कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता करण्यात आला होता. तसेच, माता व बाल आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना व पर्यायी आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. दरम्यान, दुर्गम व आदिवासी पाड्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य विषयक सोई-सुविधा मिळत नसल्याने आरोग्य विषयक जीवनावश्यक सेवा प्रत्येक गरीब सामान्य रुग्णाला हक्काने मिळण्याबाबतची तक्रार/निवेदन श्रमजीवी संघटना महाराष्ट्र, जिल्हा-ठाणे यांनी शासनाकडे केली आहे.
(३) राज्य शासनाने निश्चित केलेल्या शाश्वत विकास ध्येयप्राप्ती करण्याकरीता सन २०२५ पर्यन्त अर्भक मृत्यू दर १३ प्रती १,००० जिवंत जन्म साध्य करण्याचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले आहे. एसआरएस २०१९ सर्वेनुसार राज्याचा अर्भक मृत्यू दर हा १,००० जिवंत जन्मामागे १७ इतका साध्य करण्यात आला आहे.
(४) ठाणे जिल्ह्यातील नवजात बालके, बाल मृत्यू व माता मृत्यू रोखण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून मागणी केल्याचे दिसून येत नाही.
(५) कोरोना काळात ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी पाड्यांमध्ये माहे ऑगस्ट २०२० ते जानेवारी २०२२) १५५ नवजात बालक, ५५ बालमृत्यू व १९ माता मृत्यू झालेल आहेत. दरम्यान, राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मनुष्यबळाचा वापर हा कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता करण्यात आला होता. यास्तव, माता व बाल आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने आरोग्य केंद्रांना मार्गदर्शक सूचना व पर्यायी आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.
(६) नवजात मृत्यू व बाल मृत्यू कमी करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

* बाल आरोग्य संबंधी योजना :

आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (NBSU), नवजात शिशु कोपरा (NBCC), बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र (CTC) , पोषण पुनर्वसन केंद्र (NFRC), बाल मृत्यू अन्वेषण जंतनाशक (De-Wornming Drive) व जीवनसत्व “अ” मोहिम, घरच्या घरी नवजात बालकांची काळजी (Home Based New Born Care) इ. बाल आरोग्य संबंधीच्या उपाययोजना करण्यात येतात.

* नवसंजिवनी योजना :

१३ व्या वित्त आयोगांतर्गत इन्टेसिफाईड एचबीएनसी (Intensified HBNC), होम बेस्ड केअर फॉर यंग चाईल्ड

(HBYC), जोखिमग्रस्त कार्यक्षेत्रातील आशा स्वयंसेविकांमार्फत न्युमोनिया व सेप्सीस या आजारांचे व्यवस्थापन (Mother Absolute Affection-MAA), तसेच अतिसार नियंत्रण पंधरवाडा मध्ये मान्सूनच्या काळात अतिसारामुळे होणारे बालमृत्यू टाळण्यासाठी ORS व Zinc गोळ्यांचे वितरण करण्यात येते.

* माता आरोग्य संबंधी योजना :

जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सरक्षा कार्यक्रम, मातृ वंदन योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान व सुरक्षित मातृत्व अभियान आश्वासन इ. माता आरोग्य संबंधीच्या उपाययोजना करण्यात येतात.

चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३८) ४३७८८ (०७-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात अनेक पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सन २०२१-२२ या निवडसूची वर्षात महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने एकूण ६२ अधिकाऱ्यांना सदर संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात आलेली असून त्यामध्ये चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत ०३ अधिकाऱ्यांना पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच, सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०१७ मध्ये प्रसिध्द केलेल्या एकूण ३० पदांच्या जाहिरातीनुसार मुलाखती झाल्या असून अंतिम निकाल प्रतिक्षाधीन आहे. तसेच, सन २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास एकूण ४२ पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. त्यानुसार सरळ सेवेच्या कोट्यातुन अधिकाऱ्यांमधुन चंद्रपूर जिल्हा परिषदेतील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्यात येतील.

चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गांची एकूण १२६ मंजूर पदांपकी ५४ पदे भरलेली असुन, ७२ पदे रिक्त आहेत. सदरहू वैद्यकीय अधिकाऱ्यांची ७२ पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात आली आहेत.

तसेच, जिल्हा परिषद आरोग्य विभागातील गट-क या संवार्गातील आरोग्यसेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधी निर्माण अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गातील पदे जिल्हा निवड मंडळामार्फत भरण्यास ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.१०.०५.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली असुन, त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत वापरण्यात आलेल्या वाहना बाबत

(३९) ४५५३० (०९-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलांच्या आरोग्याचे संवर्धन, विकास तसेच तपासणी करण्यासह त्यांच्यात अढळणाऱ्या आजारांना पायबंध घालणे अश्या अत्यंत महत्वाच्या उद्देशाने शासनाने बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम सुरु केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्रमाअंतर्गत कार्य करण्यासाठी आष्टी, परळी, केज, धारुर, अंबाजोगाई व बीड तालुक्यातील एकुण २५ खाजगी वाहने दिनांक २१ मे,२०२१ रोजी वा त्यासुमारापासून बंद असल्याकारणाने त्या तालुक्यातील शाळा व अंगणवाडी मधील बालकांची आरोग्य तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उन्हाळी सुट्टया संपताच शाळा सुरु होण्यापूर्वी बीड जिल्ह्यात आरबीएसके कार्यक्रमाअंतर्गत वापरात असलेली वाहने वेळेवर उपलब्ध करून देण्यासह जिल्ह्यातील सर्व बालकांची तपासणी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे दि. २८ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबबातत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत कार्य करण्यासाठी वाहने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. तानाजी सावंत (२४-११-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यात मे, २०२१ ते मे, २०२२ या कालावधीत "कोविड-१९" च्या प्रार्दुभावामुळे बीड जिल्ह्यातील सर्व शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे, मे २०२१ पासून बीड जिल्ह्यातील ३९ वाहनांपैकी ०४ वाहने दिनांक २१ मे २०२१ पासून, ०३ वाहने दिनांक २२ मे २०२१ पासून, ०४ वाहने दिनांक २४ मे २०२१ पासून, ०२ वाहने दिनांक ०१ नोव्हेंबर २०२१ पासून व ०३ वाहने दिनांक २५ मे २०२२ पासून अशा एकूण १६ वाहनांची फिटनेस व टि-परमीट संपल्यामुळे सदरची वाहने टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात आले होते. तथापि, उर्वरित २३ वाहने आरबीएसकेच्या इतर कामकाजासोबत "कोविड-१९" च्या कामासाठी चालू ठेवण्यात आले होते.
(३) दि. ०९.०७.२०२२ व २३.०७.२०२२ रोजीच्या निवेदनाद्वारे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे मागणी केली आहे.
(४) सद्यस्थितीत बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत कार्य करण्यासाठी ३९ टी-परमीटची वाहन उपलब्ध असून, नियमित शाळा व अंगणवाडी मधील लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद महिला बालविकास विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या राजस्थान अभ्यास दौऱ्याबाबत

(४०) ४५६२८ (०९-१०-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद महिला बालविकास विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या राजस्थान अभ्यास दौऱ्याची त्रयस्थ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्यांनी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२४-११-२०२२) : (१) होय.
(२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेमार्फत याबाबत चौकशी करण्यात आली असून अभ्यास दौरा कार्यक्रम योग्य प्रकारे पूर्ण झाल्याने, जिल्हा परिषदेवर कोणतेही अतिरिक्त आर्थिक दायित्व निर्माण होत नसल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चोपडा (जि.जळगांव) तालुक्यात आरोग्य सोयी मिळण्याबाबत

(४१) ४५६७७ (११-१०-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यात आदिवासी भाग जास्त असल्याने या भागात कुपोषण व अन्य साथीचे आजाराच्या प्रमाणात वाढ होत असून येथील रुग्णालयात खाटांची कमतरता असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याने उपजिल्हा रुग्णालयातील खाटांची संख्या वाढतून २०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करण्याबाबतची मागणी तसेच या रुग्णालयाकरिता माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान मंजूर करण्यात आलेली सिटी स्कॅन मशिन अद्याप उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याने सदर मशिन तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ ऑगस्ट,२०२१ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व दि.१८ मे,२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चोपडा तालुक्यातील कार्यरत असलेले हातेड प्राथमिक आरोग्य केंद्र हे घोडगाव व परिसरातील १६ गावांना भौगोलिकदृष्ट्या दूर पडत असल्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यास विलंब होत असल्याने घोडगाव (ता,चोपडा,जि.जळगांव) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑगस्ट,२०२१ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व दिनांक १७ मे, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच , चोपडा तालुक्यातील कार्यरत असलेले गोरगावले प्राथमिक आरोग्य केंद्र हे विरवाडे व परिसरातील ११ गावे व ६ आदिवासी वाड्या/वस्तींना भौगोलिकदृष्ट्या दूर पडत असल्यामुळे रुग्णांवर वेळेत उपचार मिळत नसल्याने, विरवाडे(ता,चोपडा, जि.जळगांव) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०८ ऑगस्ट,२०२१ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व आणि दि.१७ मे,२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहेहोत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने केलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर मागण्याबाबत क्षेत्रीयस्तरावर कार्यवाही सुरु आहे. सन २०११ च्या लोकसंख्येवर जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आयुक्तालयस्तरावर सुरु असून आरोग्य संस्था स्थापन / श्रेणीवर्धनांच्या मागण्याबाबत निकषानुसार कार्यवाही करुन जोड बृहत आराखडयामध्ये समावेश करण्यात येईल. तसेच चोपडा (जि.जळगाव) येथे बाहय सेवा पुरवठादारामार्फत सी.टी.स्कॅन सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कळबणी बु.(ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयास
मंजूर झालेले सिटीस्कॅन मशिन कार्यान्वित करण्याबाबत.

(४२) ४५८३९ (११-१०-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळबणी बु.(ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयास मंजूर झालेले सिटीस्कॅन मशिन अद्यापपर्यंत रुग्णालयास प्राप्त झाले नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे तेथील रुग्णांना खाजगी रुग्णालयात जादा फी देऊन उपचार घ्यावे लागत असल्याने सदर मशिन रुग्णालयात न येण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर सिटी स्कॅन मशिन केव्हापर्यंत या रुग्णालयात देण्यात येणार असून केव्हापर्यंत कार्यान्वित करण्याचे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (२२-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प अंमलबजावणी आराखडा २०१९-२० F.M.R. Code ६.४.२ Free Radiological Services अंतर्गत राज्यातील निवडक आरोग्य संस्थांमध्ये C.T .Scan व M.R.I. सेवा बाहय सेवा पुरवठादारामार्फत उपलब्ध करुन घेण्याकरीता करावयाच्या निविदा प्रक्रियेस दिनांक ०५.०८.२०२० च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दिनांक १०.०५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत राज्यातील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाकरीता सी.टी. स्कॅन सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामध्ये कळबणी बु. (ता. खेड, जि. रत्नागिरी) या संस्थेचा समावेश आहे. सदरहू निविदेची प्रक्रिया खरेदी कक्षामार्फत सुरु असून ती अंतीम टप्प्यात आहे. निविदा प्रक्रिया पुर्ण होताच बाह्यसेवा पुरवठादारा मार्फत उपजिल्हा रुग्णालय कळबणी बु. (ता. खेड, जि.रत्नागिरी) करीता सी.टी. स्कॅन सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरात महात्मा फुले योजनेशी संलग्न असलेल्या रुग्णालयात या योजनेसाठी राखीव खाटांची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत

(४३) ४५९४२ (११-१०-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात १२ व ग्रामीण भागात ३७ रुग्णालये असून महात्मा फुले योजनेशी संलग्न असलेल्या प्रत्येक रुग्णालयात त्यांच्या एकूण उपलब्ध असलेल्या खाटांच्या क्षमतेच्या या योजनेसाठी २५ टक्के खाटा राखीव असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या दीड हजाराहून अधिक खाटा या योजनेसाठी राखीव असतानाही या योजनेशी संलग्न रुग्णालयामध्ये खाटा उपलब्धतेची माहितीच मिळत नसल्याने रुग्ण व नातेवाईकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपलब्ध खाटांची माहिती रुग्णांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३), जिल्हयातील रुग्णालयाकडून ८ तक्रारी प्राप्त झाल्या असून याबाबत संबधित रुग्णालयाकडून स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत २५ टक्के राखीव खाटांची माहिती योजनेच्या फलकावर नमूद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय (शर्विन) येथील शवविच्छेदन गृहातील फ्रीजर, वातानुकूलित यंत्र बंद असल्यामुळे मृतदेहांची विटंबना होत असल्याबाबत.

(४४) ४६६६६ (११-१०-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय (शर्विन) येथील शवविच्छेदन गृहातील मृतदेह ठेवण्यासाठी असलेले फ्रीजर हे गेले तीन महिन्यांपासून बंद असल्याचे दिनांक ९ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे मृतदेह ठेवण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून येथील रुग्णालय प्रशासन वातानुकुलित (एसी) रुमचा वापर करतात परंतु या रुममधील वातानुकुलित यंत्र देखील गेल्या आठ दिवसांपासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फ्रिजर आणि वातानुकुलित दोन्ही बंद असल्याने मृतदेह अधिक काळ शवविच्छेदन गृहात ठेवणे कठीण झाले असून मृतदेहातून येणारा दुर्गंधी येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहन करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील फ्रीजर व वातानुकुलिन यंत्राची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शवविच्छेदन गृहातील वातानुकुलीत यंत्र नादुरुस्त होते. तथापि ते दुरुस्त करण्यात आले असून सद्यस्थितीत कार्यान्वित आहे.

(३) हे खरे नाही.

(४) दि.०९ मे २०२२ पूर्वी विद्युत पुरवठा कमी होत असल्याने शवविच्छेदन गृहातील वातावरण थंड होत नव्हते. म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांच्याशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधुन वातानुकुलीत यंत्रे दुरुस्त करण्यात आली. तसेच तात्पुरती व्यवस्था म्हणून ग्रामीण रुग्णालय, नांदगाव खांडेश्वर येथे अतिरिक्त असलेले मॉर्च्युरी कॅबिनेट दि.१८.०५.२०२२ रोजी सामान्य रुग्णालयातील शवविच्छेदन गृहामध्ये बसविण्यात आले असून तेत सुरळीत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेडा (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत.

(४५) ४६८१२ (११-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेडा (जि.यवतमाळ) येथे सुमारे १४ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले उपजिल्हा रुग्णालय विनावापर असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या रुग्णालयात आवश्यक असलेली यंत्रसामुग्री तसेच पद भरतीही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालय कार्यान्वित करुन आवश्यक असलेली यंत्रसामुग्री तसेच पद भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
रुग्णालयाच्या इमारतीचे सिव्हील काम पूर्ण झाले आहे. ईमारतीत विद्युतीकरणाचे कामे सुरु आहेत. वातानुकुलीत यंत्र तसेच अग्निशामक यंत्रणा बसविण्याचे काम सद्यस्थितीत सुरु आहे. तसेच सद्यस्थितीत कोवीड हेल्थ सेंटर सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) उपजिल्हा रुग्णालय उमरखेड करीता यंत्रसामग्री खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव दि.०९.११.२०२०रोजी हाफकीन जीव औषधनिर्माण महामंडळ अतंर्गत खरेदी कक्ष यांना सादर केलेला आहे. तसेच उमरखेड येथील १०० खाटांच्या रुग्णालयाच्या आकृतीबंधानुसार एकुण नियमीत पदे व बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाचे एकुण ९५ पदे मंजुर आहेत व त्यापैकी ७० पदे भरण्यात आली आहे व रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महागांव (जि. यवतमाळ) येथील ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करणेबाबत

(४६) ४७०९५ (११-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागांव (जि. यवतमाळ) येथील उभारण्यात आलेली ग्रामीण रुग्णालयाची सुसज्ज इमारत उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयाचे अद्यापपर्यंत उद्घाटन न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या रुग्णालयाचे उद्घाटन करुन किती कालावधीत हे रुग्णालय कार्यान्वित होणार आहे ?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) रुग्णालयाच्या ईमारतीचे स्थापत्य बांधकाम पुर्ण झालेले आहे. परंतु रुग्णालय कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने अंतर्गत अंतिम कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कामे करुन मिळणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांना पत्र देण्यात आलेले आहे.
शासन निर्णय दि.२३.६.२०२२ अन्वये ग्रामीण रुग्णालय, महागांव करीता २६ पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांचेकडुन अंतर्गत कामे करुन घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच रुग्णालयामध्ये पदभरती होताच रुग्णालय कार्यान्वित करण्यात येईल.

कळंब (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुगणालयात पूर्णवेळ वैद्यकिय अधिक्षक नियुक्त करण्याबाबत

(४७) ४८१३७ (०३-११-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुगणालयातील नियमित वैद्यकिय अधिक्षक डॉ.जीवन वायदंडे हे सेवानिवृत्त झाल्यामुळे प्रभारी वैद्यकिय अधिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपजिल्हा रुग्णालयाकरीता त्वरित पूर्णवेळ वैद्यकिय अधिक्षक नियुक्तीची मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयाच्या बाहय रुग्ण विभागात (ओपीडी) दररोज जवळपास पाचशे रुग्णांवर उपचार केले जात असून विविध तपासणीसाठी येणा-या रुग्णांची संख्याही मोठी असल्याने येथे पूर्णवेळ वैद्यकिय अधिक्षक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (१७-११-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) सन २०२१-२२ निवडसूची वर्षात महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने एकूण १५६ अधिकाऱ्यांना सदर संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच, सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास एकूण १७२ पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून, त्यामधून उपलब्ध होणाऱ्या अधिकाऱ्यांमधून कळंब (जि. उस्मानाबाद) येथील वैद्यकीय अधीक्षक पद भरण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि.बीड. येथे ENDOSCOPIC CEMARA सिस्टीम खरेदीच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत

(४८) ४८६०८ (०७-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि.बीड. येथे रुग्णांवर ८ ते १० वर्ष जुन असलेल्या ENDOSCOPIC CEMARA सिस्टीम ने कान,नाक,घसा वा शस्त्रक्रिया करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सिस्टीम उपलब्ध करून देणे बाबतचा खरेदीचा पूर्ण प्रस्ताव नियमित अनुदाना व्यतिरिक्त अनुदान मंजूर करून निधी उपलब्धतेसह प्रशासकीय मंजुरी साठी संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई. यांनी सचिव, वैद्यकीय शिक्षण, मुंबई. यांच्याकडे सादर केला आहे,हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास,रुग्णालयात नवीन ENDOSCOPIC CEMARA सिस्टीम खरेदी प्रक्रिया त्वरित पूर्ण करून सदर सिस्टीम उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याडे दि. ०८ फेब्रुवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयाला ENDOSCOPIC CEMARA सिस्टीम उपलब्ध करून देण्याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन (०४-१०-२०२२) : (१) होय.
(२) व (३) होय.
(४) सदर यंत्र खरेदीची प्रक्रिया हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ यांच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई, जि. बीड. येथील स्वा.रा.ती.शा.ग्रा.वै. महाविद्यालय व रुग्णालात नुतनीकरण करण्याचे काम अत्यंत निकृष्ठ दर्ज्याचे केल्या बाबत.

(४९) ४८६२६ (०७-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबेजोगाई (जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णाल येथे कोव्हीड-१९ च्या अनुशंगाने २८८ खाटांच्या नुतनीकरण करण्याचे काम निकृष्ट दर्ज्याचे झाले असून उपविभागीय अभियंता (वि.प्र), अंबाजोगाई व संबंधित कंत्राटदार यांनी संगनमताने सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जीचे करून गैरकारभार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात क्षमतेपेक्षा दुप्पट रुग्ण उपचार घेत असतानाही सदर कमा हे अंदाजपत्रकाप्रमाणे न करता निकृष्ठ दर्ज्याचे केल्याने सदर कामची उच्चस्तरीय अधिकारी यांच्यामार्फ चौकशी/तपासणी करूनच संबंधित कंत्राटदाराला देयके अदा करणे बाबत व सदर निकृष्ठ केलेल्या कामात सर्व संबंधित दोषीवर तातडीने कार्यवाही करणे बाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २१ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन (०४-१०-२०२२) :(१) नाही.
(२) होय.
(४), (५) व (६) सदर काम हे अंदाजपत्रकातील निकषानुसार करण्यात आलेले असून कामे करण्यात आलेले वार्ड सुस्थितीत असून रुग्णसेवा सुरळीतपणे सुरु आहे.

तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची झालेली दुरावस्था .

(५०) ४८९८६ (११-१०-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची दुरावस्था झाली असल्याने मृतदेह उघड्यावर ठेवण्याची वेळ येत असल्याने या मृतदेहाची वन्य प्राणी कोल्हे ,कुत्रे विल्हेवाट लावत असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याची बाब माहे एप्रिल,२०२२ च्या पहिल्या आठवड्यात व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन ग्रहांची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सावंत (११-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.